## प्रशासकीय मान्यता
## आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम सन- २०१२-१३

**वाचा-**

१) शासन निर्णय नियोजन विभाग क्र.डीपीसी -१०८४/सीआर-२१/पीआरपी-२ दिनांक ३१ मे १९८४
२) शासन परिपत्रक क्र स्थाविका-१०९६/प्र.क्र.२६/का-१४४५ दिनांक २८ सप्टेंबर,१९९८
३) शासन निर्णय क्रमांक स्थाविका-२०११/प्र.क्र.३७/का-१४८२ दिनांक १६ मे २०११
४) शासन आदेश क्र. स्थाविका-२०१२/प्र.क्र.-६९/का-१४८२ दिनांक ११ जून, २०१२

**आदेश क्रं.** जिनिस/भं/स्थाविका/का-१/प्रमा/१२८७/२०१२
दिनांक :- २१/०९/२०१२

**आदेश**

१) उपरोक्त शासन निर्णय क्र.१ व २ अन्वये जनतेला उपयुक्त लहान लहान कामे (स्थानिक विकास कार्यक्रम) घेण्याच्या कार्यक्रमासाठी जिल्हयाला देण्यात आलेल्या विशेष तरतूदीतनू घ्यावयाच्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले आहेत. त्या अधिकाराचा वापर करून या कार्यक्रमांतर्गत सन २०१२-२०१३ मध्ये घ्यावयाच्या परिशिष्ट **"अ"** मध्ये दाखविण्यात आलेल्या कामांना स्तंभ क्रं. ४ मधील अंदाजपत्रकीय किंमतीला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे

२) उपरोक्त संदर्भाकिंत क्र. ३ अन्वये आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमातंर्गत भंडारा जिल्हयासाठी राखून ठेवलेल्या विशेष तरतूदीतून २०१२-२०१३ मध्ये घ्यावयाच्या कामावरील खर्च भागविण्यासाठी एकूण रूपये ७४६.७८९ लक्ष जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे सुपूर्द करण्यात आलेले आहेत.

३) संदर्भाकिंत क्रमांक ३ अन्वये जिल्हयास प्राप्त झालेल्या निधीपैकी अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरीता व २०१२-२०१३ हया वर्षातील नविन कामांचा खर्च भागविण्याकरीता रूपये ६.११ लक्ष परिशिष्ट **"अ"** मधील रकाना २ मध्ये दाखविलेल्या **२** कामांना रकाना ५ मध्ये दर्शविल्यानुसार रूपये **६.११** लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| **अ. क्रं.** | **योजना कार्यान्वित करणारे अधिकारी** | **परिशिष्ट - अ मधील नविन कामांची संख्या** | **अंदाजित किंमत** | **प्रशासकीय मान्यता किंमत** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कार्यकारी अभियंता, सा. बां., जि. प., भंडारा** | २ | ६.११ | ६.११ |
| | **एकूण २ कामे** | | **६.११** | **६.११** |

४) वरील तक्त्यातील स्तंभ क्रं. ५ मध्ये मंजूर करण्यात आलेली तरतूद ही चालू वित्तीय वर्षात मतदार संघातील प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या कामांसाठी परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविण्यात आलेला खर्च करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी निधीची स्वतंत्र मागणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे नोंदविणे आवश्यक राहील. त्यानूसार निधीचे वितरण करण्यात येईल.

५) कामास सूरूवात करण्यापूर्वी या कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेल्या कामांबाबत कोणत्याही प्रकारे खाजगी जमिनीचा प्रश्न उदभवणार नाही, याची क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी खात्री करून घेतली पाहिजे. तसेच या कार्यक्रमांतर्गत कामास कार्यवाही यंत्रणेने दिलेल्या तांत्रिक मान्यतेचे अधिन राहून प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. तांत्रिक बाबी संबंधीची सर्व जबाबदारी संबंधीत तांत्रिक मान्यता प्रदान करणाऱ्या यंत्रणेवर राहील.

६) या कार्यक्रमातील कामावर होणाऱ्या खर्चाच्या निधीच्या हिशेबासाठी रोजगार हमी योजनेत ज्या लेखापध्दतीचा वापर होतो, त्याच लेखा पध्दतीचा अवलंब करावा.

७) या कार्यक्रमावर होणारा खर्च खालील लेखाशिर्षामधू भागविण्यात यावा.

**" नियोजन विभाग, मागणी क्रमांक -ओ-१०**
**४५१५- इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च**
**१०२- सामुहीक विकास, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना,**
**राज्य योजनांतर्गत योजना,"**
**(१) बहुउद्देशिय कार्यक्रम,**
**(००) (१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम (संकेतांक ४५१५००१२)**

८) या कार्यक्रमावरील आर्थिक तरतूद परिशिष्ट "अ" मधिल स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या रकमेपर्यंत मर्यादित असून चालू आर्थिक वर्षात एवढी रक्कम खर्च व्हावी. यापैकी अखर्चित रक्कम पूढील वर्षाकारीता ठेवून घेणे वित्तीय नियमाविरूध्द आहे. करीता संपूर्ण रक्कम चालू आर्थिक वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

९) या कार्यक्रमातनू मंजूर तरतूदीतून होणारा खर्च संबंधित विधानसभा मतदार संघातील मंजूर केलेल्या कामावरच खर्च करता येईल. यात कोणत्याही प्रकारचा बदल या कार्यालयाच्या परवानगीशिवाय करता येणार नाही. याचे उल्लंघन झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित कार्यवाही अधिकाऱ्याची राहील.

१०) या कार्यालयातील कांमाना नियमित योजनामधील कामांना जे निकष, नियम, मर्यादा, धोरण, कार्यपध्दती इत्यादी लागू असतील ती सर्व लागू आहेत. त्याचे काटेकोरपणे पालन होत आहे. याची खात्री करावी.

११) महाराष्ट्र शासन निर्णय नियोजन विभाग, मंत्रालय, मुबंई यांचे पत्र क्रं. स्थाविका/१०९२/जिपनिउ/सीआर-२१/यो-६ दिनांक १६ मार्च, १९९२ अन्वये जिल्हा परिषद कार्यान्वित यंत्रणेसमोर दर्शविलेला निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे सूपूर्द करण्यात येत आहे. हा निधी त्यांनी एकूण खर्चाचा आढावा घेवून संबंधित यंत्रणेला वितरीत करावा.

१२) या कार्यक्रमातील कामासाठी केवळ स्टॉक्स म्हणून काही खरेदी या निधीतून करता येणार नाही.

१३) या कार्यक्रमात हाती घेलेली कामे पूर्ण झाल्यानंतर ही संबंधीत अभिकरणाकडे परिरक्षण व देखभाली साठी हस्तांतरीत करावी व त्याचा तपशिल या कार्यलयाला सादर करावा.

१४) काम पुर्ण झाल्यानंतर ते पूर्ण झाल्याचा सविस्तर तपशिल विहित प्रपत्रात या कार्यलयाला सादर करावा. तसेच महालेखापाल, नागपूर-२ सोबत ताळमेळ केलेले (खर्च) त्रैमासिक विहित विवरणपत्रात या कार्यलयास नियमित सादर करावा.

१५) या कार्यक्रमावर झालेल्या खर्चाचा कामवार मासिक प्रगती अहवाल मतदार संघनिहाय दर महिण्याच्या ५ तारखेपर्यंत या कार्यालयास प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी.

१६) सामाजिक सभागृहाकरीता दान केलेली जमीन मुलतः व पूर्णतः दान कर्त्याच्याच नावावर असून त्याच्यावर इतर कोणाचाही हक्क किंवा अधिकार नसून दानकर्त्याला दान करण्याचे पूर्ण अधिकार असून भूमिअभिलेखात त्याची नोंद आहे व त्याआधारावर तश्या भूमिधारकांनी /भूमीस्वामीनी ती जमीान राजीखुशीने दान ठराव घेवून दाखविली पाहीजे. तसेच तश्या ठरावाच्या आधारावर गावनमुना आठ-क मध्ये नोंद घेतली पाहीजे. तशा नोंदीचा उतारा/दाखले अंदाजपत्रकात समावलेले असले पाहिजेत.

१७) सामाजिक सभागृहाकरीता दान केलेली जमीन ही कर्त्याची स्वतःच्या मालकीची असून, त्यावर कोणाचाही अधिकार नाही. दान घेणा-या सदरहू जमीन दान घेण्यास कुठलीही हरकत नाही. तसेच जमीन दान दिल्यानंतर त्याची नोंद अधिकार अभिलेख्यात करुन घेवून असे दस्ताऐवज सादर केल्याच्या अटीचे अधिनतेने सदरहू कामांना प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

१८) वास्तूचे बांधकाम सूरू करण्यापूर्वी ज्या जागेवर तशी वास्तू स्थानिक विकास निधी मधून बांधकाम विभाग बांधत आहे. ती जागा ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेला हस्तांातरीत व्हावयाची आहे. त्या संस्थेच्या निर्मळ अधिकारात असली पाहिजे व वास्तूचे बांधकाम झाल्यावर रितसर ती वास्तू तश्या संस्थेच्या ताब्यात देवून तश्या संस्थेनी ती ताब्यात घेवून गावनमुना आठ-क मध्ये नोंदण्याबाबत व संस्थेच्या मालमत्ता नोंदवहीमध्ये नोंदल्याबाबत पुरावा म्हणू तशा अभिलेख्याचा उतारा आपले दप्तरी ठेवला पाहिजे.

१९) सदरहू सामाजिक सभागृहाबाबत सर्व संबंधीतांची मान्यता असून ज्या बांधकामाबाबत कोणाचीही हरकत/तक्रार नाही या अटीवर सदरहू कामांना प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.
२०) दान कर्त्याव्दारा दान केलेल्या जमीनीवर बांधकाम प्रस्तावित केलेले असल्यास दान देण्याची प्रक्रीया पूर्ण होवून शासकिय अभिलेख्यात त्याची नोंद झाल्याशिवाय प्रत्यक्ष बांधकामास सुरूवात करू नये. या अटीवर प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.
२१) या सभागृहाचा उपयोग राजकीय कामासाठी करण्यात येवू नये.

-स्वा-
**जिल्हाधिकारी, भंडारा**

प्रतिलिपी :- माहिती तथा उचित कार्यवाहिस्तव अग्रेषित.
(१) कार्यकारी अभियंता (बांधकाम/लघू पाटबंधारे), जि.प., भंडारा
(२) कार्यकारी अभियंता, सा. बा. (राज्य), भंडारा
(३) कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा विभाग, जि.प., भंडारा
(४) ______________________________

-स्वा-
**जिल्हाधिकारी, भंडारा**

**आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम २०१२-१३**
**प्रशासकीय मान्यता**

क्र. जिनिस/भं/स्थाविका/का-१/२०१२/१२८७
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा
दिनांकः- २१/०९/२०१२

**परिशिष्ट - 'अ'** (रूपये लाखात)

| अ.क्र. | मतदार संघ / यंत्रणा /कामाचे नाव | तांत्रिक मान्यतेचे विवरण | अंदाजपत्रकीय किंमत | प्रशासकीय मान्यता किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **मतदार संघ - तुमसर** | | | |
| | **कार्यकारी अभियंता, सा. बा. जि. प., भंडारा** | | | |
| १. | मौजा सुकळी दे. ता. तुमसर येथे व्यायामशाळा बांधकाम करणे | तां.मा.क्र.६३/१२ दि. ५.६.२०१२ | ३.११ | ३.११ |
| २. | मौजा महालगाव ता. मोहाडी येथे डॉ. बाबासाहेब पुतळयासमोर सभामंडप बांधकाम | तां.मा.क्र.२१०/१२ दि. २.८.२०१२ | ३.०० | ३.०० |
| | **एकूण २ कामे** | | **६.११** | **६.११** |

-स्वा-
**जिल्हाधिकारी, भंडारा**

प्रतिलीपी :- मा. श्री अनिलभाऊ बावनकर, आमदार तुमसर मतदार संघ यांना माहितीस्तव सादर.

-स्वा
**जिल्हाधिकारी, भंडारा**